# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र१८२/२०२६

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाद्वारे प्राप्त निधीतून मुलांचे वसतिगृह क्र जी–९ या इमारतीतील तीन मजले यातील १०५ खोल्या एकूण १०५ विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात आलेल्या आहेत. करारनाम्यानुसार सदरच्या खोल्यांचा वापर विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी करावयाचा आहे. त्या अनुषंगाने स्पर्धा परीक्षा केंद्रात प्रवेशित अनुसूचित जातीच्या सर्व विद्यार्थ्यांना या वसतिगृहात प्राधान्याने प्रवेश दिला जातो.

मा. अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उपरोक्त वाटपानंतर जर काही खोल्या शिल्लक राहिल्या तर त्यात स्पर्धा परीक्षा केंद्रातील इतर संवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. मात्र अशा विद्यार्थ्यांच्या संख्येएवढी वाढीव क्षमता त्या शैक्षणिक वर्षाकरीता अनुसूचित जातीच्या इतर विभागात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या हया व इतर वसतिगृहामध्ये निर्माण करुन दिली जाईल. सर्व संबंधीतांनी उपरोक्त धोरणाचे पालन करावे.

( प्रा. डॉ. प्रफुल्ल पवार )
प्रभारी कुलसचिव